आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दु १.३० वाजता
७ जुलै २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २२ जुलैपासून सुरू होणार/ २३ जुलैला अर्थमंत्री लोकसभेत अर्थसंकल्प सादर करणार

- ओदिशातल्या जगन्नाथ रथयात्रेत जगभरातले भाविक सहभागी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूही यांचीही उपस्थिती

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून रशिया आणि ऑस्ट्रियाच्या दौऱ्यावर

- जम्मू काश्मीरच्या कुलगाम इथं सुरक्षादलं आणि दहशतवादी यांच्यात चकमक, सहा दहशतवादी ठार, तर अकोल्याच्या जवानासह दोन जवानांना वीरमरण

**आणि**

- क्रिकेटमध्ये पुरुष संघाचा झिम्बाब्वेसोबत तर महिला संघाचा दक्षिण आफ्रिकेसोबतचा दुसरा सामना आज रंगणार

**<><><><><>**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २२ जुलैपासून सुरू होणार असल्याची माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रीजिजू यांनी समाज माध्यमावरल्या पोस्टद्वारे दिली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन २३ जुलैला लोकसभेत २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करतील. १२ ऑगस्टपर्यंत हे अधिवेशन सुरू राहणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार तिसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतरचा हा पहिलाच अर्थसंकल्प असेल. हा अर्थसंकल्प सरकारची दूरगामी धोरणं आणि भविष्यवेधी दृष्टिकोनाचा

प्रभावी दस्तऐवज असेल असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गेल्या महिन्यांत संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीतल्या अभिभाषणात म्हटलं होतं. लोकसभा निवडणुकांमुळे यावर्षी फेब्रुवारीमध्ये अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता.

**<><><><>**

ओडिशात, भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र, देवी सुभद्रा आणि भगवान सुदर्शन यांची जगप्रसिद्ध रथयात्रा आज पुरी या शहरात होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या वार्षिक उत्सवात सामील होणार आहेत. जगातल्या विविध भागातून लाखो भाविक इथं आले आहेत. श्री जगन्नाथ मंदिराच्या सिंह दरवाजासमोर स्थित आणि श्री गुंदिचा मंदिरात नेण्यासाठी रथ तयार असून तिथं ते आठवडाभर राहतील. सर्व विधी आटोपल्यानंतर आज संध्याकाळी पाच वाजता भाविक रथ ओढणार आहेत. प्रथेला फाटा देत यावेळी भगवान जगन्नाथ, देवी सुभद्रा आणि भगवान बलभद्र या तिन्ही भावंड देवतांचा समावेश असलेले अनेक विधी एकाच दिवशी केले जातील. जगन्नाथाची रथयात्रा एक दिवसाची असते, परंतु विशिष्ट खगोलीय व्यवस्थेमुळे, ती या वर्षी दोन दिवस चालणार आहे, यापूर्वी १९७१ मध्ये अशी स्थिती आली होती.

ओदिशा राज्य सरकारने रथयात्रेसाठी आज आणि उद्या अशी दोन दिवसांची सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. या उत्सवात १० ते १५ लाख भाविक येण्याची शक्यता आहे. यासाठी राज्य सरकारनं चोख सुरक्षा व्यवस्था ठेवली आहे.

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी सर्व देशवासियांना जगन्नाथ यात्रेनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून रशिया आणि ऑस्ट्रियाच्या तीन दिवसीय अधिकृत दौऱ्यावर जाणार आहेत. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात मोदी २२ व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियन फेडरेशनचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन

यांच्या निमंत्रणावरून मॉस्कोमध्ये उपस्थित असतील. दोन्ही देशांमधल्या संपूर्ण बहुआयामी संबंधांचा आढावा दोन्ही नेते घेतील.

रशियाचा दौरा आटोपल्यानंतर प्रधानमंत्री मंगळवारी ऑस्ट्रियाला पोहोचतील. ऑस्ट्रियाचे चान्सलर कार्ल नेहॅमर यांनी मोदी यांची व्हिएन्ना भेट हा विशेष सन्मान असल्याचं सांगत आपण या भेटीची आतुरतेनं वाट पाहत असल्याचं म्हटलं आहे. गेल्या ४१ वर्षांतली भारतीय प्रधानमंत्र्यांची ही पहिलीच ऑस्ट्रिया भेट असेल. व्हिएन्ना इथं मुक्कामा दरम्यान, मोदी ऑस्ट्रियाचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर व्हॅन डेर बेलेन यांची भेट घेतील आणि चांसलर नेहॅमर यांच्याशी चर्चा करतील.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये कुलगाम जिल्ह्यात काल सुरक्षादल आणि दहशतवादी यांच्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या चकमकीत सहा दहशतवादी ठार झाले तर दोन जवानांना वीरमरण आलं. या दोघांपैकी एक जवान महाराष्ट्रातल्या अकोला जिल्ह्यातला आहे. कुलगाम मध्ये चिन्नीगाम आणि मोडेरगाम इथं दहशतवादी लपून बसल्याची खबर कळताच सुरक्षा दलांनी तातडीनं कारवाई केली. चिन्नीगाम इथं चार आणि मोडेरगाम इथं एक दहशतवादी ठार झाला. या दोन्ही ठिकाणी अद्याप सुरक्षादलांची कारवाई सुरु असल्याचं वृत्त आहे. मोडरगम इथल्या चकमकीत अकोला जिल्ह्यातल्या मोरगाव भाकरे इथल्या प्रवीण प्रभाकर जंजाळ या जवानाला हौतात्म्य आलं. चौघांना ठार केल्यानंतर दहशतवाद्यांकडून करण्यात आलेल्या अंधाधुंद गोळीबारात प्रवीण यांच्या डोक्याला गोळी लागल्याची माहिती रेजिमेंटनं त्यांच्या कुटुंबियांना कळवली. प्रवीण जंजाळ यांचे पार्थिव विमानानं नागपूरला आणण्यात येणार असून त्यानंतर ते त्यांच्या मूळगावी नेलं जाणार आहे.

**<><><><><>**

इस्रायलनं काल गाझा पट्टीतल्या एका शाळेच्या इमारतीवर केलेल्या हवाई हल्ल्यात १६ जणांचा मृत्यू झाला तर ५० हून अधिक जण जखमी झाले आहेत.

या इमारतीमध्ये हजारो विस्थापित लोक राहत होते, असं गाझाच्या आरोग्य मंत्रालयानं सांगितलं. तर या शाळेच्या परिसरात लपलेल्या दहशतवाद्यांना ठार केलं असल्याचं इस्रायलच्या संरक्षण दलानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

गुजरातच्या सूरतमध्ये औद्योगिक वसाहतीत काल सहा मजली इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला आहे, तर एका महिलेला वाचवण्यात यश आलं आहे. या महिलेला रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलांनी रात्रभर मदत आणि बचावकार्य करून सहा पुरुष आणि एका महिला असे एकंदर सात मृतदेह बाहेर काढले आणि आज सकाळी मदत आणि बचाव कार्य थांबवण्यात आलं.

झारखंडच्या देवघर जिल्ह्यात आज सकाळी दोन मजली इमारत कोसळून दोन जणांचा मृत्यू झाला आहे, तर सात जणांना वाचवण्यात यश आलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या बहुतांश भागात पावसानं काल आणि आज हजेरी लावली. नवी मुंबईत पावसामुळं रबाळे एमआयडीसी भागात डोंगरावरचे मोठे दगड खाली कोसळले आहेत. या भागातल्या रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याचं काम सुरू आहे. पावसाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचं प्रत्येकी एक पथक ठाणे, कुर्ला, घाटकोपर आणि पालघर इथं, तर तीन पथकं अंधेरीत तैनात करण्यात आली आहेत. ठाण्यातलं पथक शहापूर भागात मदत आणि बचावकार्यात गुंतलं आहे.

**नाशिक, परभणी, रत्नागिरी** आणि **बुलडाणा** जिल्ह्यांतही मुसळधार पाऊस झाला आहे. **गडचिरोली** आणि **अकोल्यात** वातावरण ढगाळ आहे, मात्र पावसानं हजेरी लावलेली नाही.

**<><><><><>**

तेलंगण आणि आंध्र प्रदेश या दोन राज्यांदरम्यान प्रलंबित असलेल्या समस्या सोडवण्यासाठी तीन स्तरांवर समित्या स्थापन करण्याचा निर्णय या दोन्ही राज्यांनी घेतला आहे. तेलंगणचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू या दोघांनी काल हैदराबाद इथं प्रलंबित मुद्द्यांवर चर्चा केली.

**<><><><><>**

भारताची डिजिटल आर्थिक व्यवहार प्रणाली **UPI अर्थात युनिफाइड पेमेंट इंटरफेस** आता संयुक्त अरब अमिराती मध्ये सुरु होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि UAE चे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांनी यावर्षी फेब्रुवारीमध्ये अधिकृतपणे अबू धाबीमध्ये UPI सेवा सुरू केली होती.

**<><><><><>**

फ्रान्समध्ये मध्यावधी निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याचं मतदान आज होत आहे. विद्यमान संसदेचा तीन वर्षांचा कार्यकाळ बाकी असतानाच फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी ९ जून रोजी संसद विसर्जित करून मद्यावधी निवडणुकांची घोषणा केली आहे.

**<><><><><>**

विम्बल्डन टेनिस अजिंक्यपद स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत काल झालेल्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा जोडीदार मॅथ्यू एब्देन यांना जर्मनीच्या हेंड्रिक जेबेन्स आणि कॉन्स्टान्टिन फ्रांटझेन यांच्याकडून थेट सेट्समध्ये पराभव पत्करावा लागला.

**<><><><><>**

**क्रिकेट/पूल/अंकिता**

भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघांदरम्यान सुरू असलेल्या मर्यादित २० षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज संध्याकाळी ७ वाजल्यापासून चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम मैदानावर होणार आहे. मालिकेतल्या पहिल्या सामन्यात अवघ्या १२ धावांनी झालेल्या पराभवानंतर हा सामना जिंकून बरोबरी साधण्याचं भारताच्या संघाचं लक्ष्य असेल. दक्षिण आफ्रिकेचा संघ सध्या एका महिन्याच्या भारत दौऱ्यावर आहे.

पुरुष क्रिकेटमध्ये भारत आणि झिंबाब्वे यांच्यात सुरू असलेल्या मर्यादित २० षटकांच्या पाच सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज झिंबाब्वेच्या हरारे इथं भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी साडेचार वाजल्यापासून सुरू होईल. या मालिकेत सध्या यजमान झिंबाब्वे १-०नं आघाडीवर आहे. काल झालेल्या पहिल्या सामन्यात झिंबाब्वेनं भारताचा १३ धावांनी पराभव केला होता.

**<><><><><>**

हवामान विभागानं आज मध्य महाराष्ट्र, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, पंजाब, पूर्व राजस्थान, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, आणि दक्षिण कर्नाटकात काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केली आहे. उत्तराखंडमध्ये अतिवृष्टी होण्याची शक्यता लक्षात घेता सावधगिरी म्हणून काही काळासाठी चारधाम यात्रा स्थगित करण्यात आली आहे.

**//<><><><><>//**